# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ११५-२२ दिनांक :- २५/०४/२०२२

## अवैध गुटखा वाहतूक करणाऱ्या सराईत आरोपीतास नवघर पोलीसांनी अटक करुन ३,७८,५४८/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

दिनांक २४/४/२०२२ रोजी नवघर पोलीस ठाण्याचे पोनि/सुशिलकुमार शिंदे व पोलीस पथक असे रात्रगस्त फिरत असतांना ०४.०० वाजेच्या सुमारास गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, महाराष्ट्र राज्य शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखूजन्य गुटखा हा प्रतिबंधीत माल तपकीरी रंगाची मारुती स्वीप्ट डिझायर कार क्र. एम.एच.०५/सीएम.६५१५ हिचेतुन विक्री करण्यासाठी वापी गुजरात येथून आणुन तो नवघर भाजी मार्केट भाईंदर पुर्व येथे येणार आहे अशी खात्रिशिर बातमी मिळाल्याने सदर बातमी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मिलींद देसाई यांना कळविली. वपोनि देसाई यांनी पोलीस उप आयुक्त, परि-०१ व सहायक पोलीस आयुक्त नवघर विभाग यांना अवगत करुन नवघर, भाईंदर पूर्व भाजी मार्केट येथे पोनि/सुशिलकुमार शिंदे व स्टाफ यांनी वेगवेगळी पथके तयार करुन सापळा लावला लावून पहाटे ०४.३० वाजण्याचे सुमारांस एक तपकीरी रंगाची मारुती स्वीप्ट डिझायर कार क्र. एम.एच.०५/सीएम.६५१५ ही भाजी मार्केट येथे आली असता सदर स्विप्ट डिझाझर कारमध्ये असलेल्या गोणींमध्ये एसएचके. गुटखा, रोकड गोल्ड पानमसाला, बंदर तंबाखु, विमल पान मसाला असा माल आरोपी मुनिब रामब्रीक्ष गुप्ता, वय-३६, रा. ओम सी बिल्डींग, कस्तुरीपार्क, भाईंदर पुर्व हा नमुद कारमधुन विक्री करणेसाठी घेवुन आला असतांना मिळुन आला असुन त्याचे कब्जातुन ३,७८,५४८/- रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. सदर बाबत नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. I ३२३/२०२२ भादविसंक ३२८, १८८, २७३ सह अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ व नियम २०११ चे कलम २६(२)(आय), ४, ३०(२)(अ) प्रमाणे दिनांक २४/४/२०२२ रोजी दाखल करण्यात आला असुन वर नमुद आरोपी यास अटक करण्यात आली आहे.

अटक करणेत आलेला आरोपी मुनिब रामब्रीक्ष गुप्ता हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेविरुध्द नवघर पोलीस ठाणे येथे १) गुरनं. ४३३/२०२१, २) गुरनं. ५६७/२०२१, ३) गुरनं. ३६४/२०२१ व २) भाईंदर पो.ठाणे गुरनं. ३२३/२०२२ असे एकूण ०४ व वरनमुद गुरनं. I ३२३/२०२२ महाराष्ट्र राज्य शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाकुजन्य गुटखा कब्जात बाळगणे, विक्री करणे बाबत एकूण ०५ गुन्हे नोंद आहेत.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परि-०१ व डॉ. शशीकांत भोसले, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/सुशिलकुमार शिंदे, पोशि/०८०१५ नवनाथ माने, पोशि/०८०१८ जितेंद्र निवळे, पोशि/१४२०९ भोये नवघर पोलीस ठाणे यांनी केली आहे. नमुद गुन्हयाचा तपास सपोनि/हनुमंत पडळकर हे करीत आहेत.

----ooo----